ePaper

ट्रोल करणाऱ्यांवर टीका करताना बबनराव लोणीकरांची जीभ घसरली

वर्ष - ४ । अंक - 317 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

www.mahaenews.com । गुरुवार, दि. 26 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- गोलंदाजांना पाठिंबा गरजेचा!
- रोहित शर्मा तर भलताच रोमँटिक!
- ४१ वर्षांनी भारत पुन्हा अवकाशात!
- संरक्षण खर्चवाढीस मान्यता

माळेगाव सहकारी साखर कारखाना निवडणुकीत 21 पैकी 20 जागा अजित पवारांकडे, एक जागा चंद्रराव तावरे यांच्याकडे!

अजितदादांचा धमाका !

विरोधी दोन्ही पॅनलचा सपशेल धुव्वा : शरद पवारांच्या पॅनलचा सुपडा साफ!

। माळेगाव / बारामती / पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

अवघ्या राज्याचे लक्ष लागलेल्या माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीची लांबलेली मतमोजणी संपली आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताब्यात कारखाना गेल्याचे स्पष्ट झाले. २१ पैकी २० जागा जिंकून अजितदादांनी धमाका उडवून दिलेला आहे. कारखान्यावर वर्चस्व असणाऱ्या चंद्रराव तावरे यांना अवघी एक जागा मिळाली तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पॅनलला मतदारांनी साफ नाकारले आहे.

टीकेचा भडीमार, पण अजितदादांना यश!

या साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या निमित्ताने सर्व विरोधी पक्षांनी अजित पवार यांच्यावर टीकेचा अक्षरशः भडीमार केला. राज्याचे उपमुख्यमंत्रीपद असताना त्यांनी स्थानिक राजकारणात कशाला पडायचे? असा मुख्य आरोप होता तर साखर कारखान्याच्या माध्यमातून मोठ्या निधीची फिरवाफिरव करता येते असेही काहींनी टोमणे मारले. परंतु, अजित पवार यांनी प्रचंड विजय मिळवून सर्व विरोधकांची तोंडे गप्प केली आहेत.

अजितदादांचे निर्विवाद वर्चस्व!

पवार घराण्याचे वर्चस्व असणाऱ्या बारामती तालुक्यात माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीच्यानिमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील 'निळकंठेश्वर पॅनल' ने २० जागा जिंकत नेतृत्वाचे कौशल्य आणि डावपेच सिद्ध केले. तर गुरु-शिष्यांचा 'सहकार बचाव पॅनल' ला म्हणजेच चंद्रराव तावरे यांच्या पॅनलला अवघ्या एका जागेवर समाधान मानाने लागले. यामध्ये ज्येष्ठ नेते चंद्रराव तावरे निवडून आले, तर रंजन तावरे यांना पराभवाला सामोरे जावे लागले. ज्येष्ठ नेते शरद पवार गटाला सभासदांनी सपशेल नाकारले. या गटाचा सुपडा साफ झाला. त्यांना एकही जागा मिळालेली नाही.

पहिला निकाल अजितदादांचा...

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'ब' वर्गातून स्वत:ची उमेदवारी जाहीर करुन स्वतःचेच नाव चेअरमनपदासाठी घोषित केले होते. त्यामुळे या निवडणुकीला मोठ्या प्रमाणावर महत्व प्राप्त झाले आणि चुरस प्रचंड वाढली. निवडणुकीतील पहिला निकालही अजितदादांना कौल देणारा आणि त्यांच्या विजयाचा होता.

अजितदादांची रणनीती यशस्वी

अजित पवार यांनी ही निवडणूक अतिशय गांभीर्याने घेत स्वत:ची रणनीती आखली. सलग आठ ते दहा दिवस कारखाना कार्यक्षेत्रात तळ ठोकून, प्रत्येकाशी वैयक्तिकरीत्या बोलून त्यांनी सभासदांच्या गाठीभेटी घेत नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला, त्याला अफलातून यश मिळाले.

निवडणुकीची हवा, निकाल फिरवला..

त्याचप्रमाणे अजित पवार यांनी दहा ते बारा सभा घेऊन विरोधकांच्या आरोपांना तितक्याच तत्परतेने उत्तर देत निवडणुकीची हवा व निकाल आपल्या बाजूने वळवण्यात यश मिळविले. ते स्वतः उपमुख्यमंत्री असल्यामुळे साखर कारखान्याला मिळणारा निधी आणि सभासदांची रक्कम याबाबत ते ठामपणे बोलू शकले आणि सभासदांचाही त्यावर विश्वास बसला.

आक्रमक पण स्पष्ट आश्वासने..

या निवडणुकीत अजित पवार यांनी अत्यंत प्रभावी आणि आक्रमक प्रचार केला. आपल्या भाषणात त्यांनी सलग पाच वर्ष राज्यातील इतर कारखान्यांपेक्षा आपल्या कारखान्याला जास्तीचा ऊसाला दर देणार, निवडून येणाऱ्या संचालकांना कोणतेही वाहन अथवा ड्रायव्हर मिळणार नाही, संचालकांना भत्ता मिळणार नाही, त्यांना फक्त चहा मिळणार, कारखान्याला राज्याचा आणि केंद्राचा निधी मिळवून देणार, कारखाना कार्यक्षेत्रातील रस्ते एस.आर.एस फंडातून करणार, रस्ते करण्यासाठी सभासदांचा एकही रुपया घेतला जाणार नाही, केंद्राचे आणि राज्याचे अनेक निधी कारखान्याकडे आणण्यासाठी मदत करणार, संचालकाला कारखान्यातून एकही रुपयाची उचल मिळणार नसल्याची भर सभेत घोषणा केली.

शरदपवार गटाची धूळधाण..

शरद पवार गटाने सुप्रिया सुळे आणि युगेंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली 'बळीराजा सहकार बचाव पॅनल' चे २० उमेदवार या निवडणुकीमध्ये उभे केले होते. त्यांच्या उमेदवारांनी साधारणपणे ५०० ते १००० मते घेतली.

पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी!

आंतरराष्ट्रीय द्विपक्षीय/बहुपक्षीय एजन्सींची समान गुंतवणूक

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये ३ हजार ६२६ कोटींच्या पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी देण्यात आली. हा टप्पा वनाझ-रामवाडी या पहिल्या टप्प्याचे विस्तारीकरण असेल. त्यामध्ये वनाझ ते चांदणी चौक (कॉरिडॉर २-अ) आणि रामवाडी ते वाघोली/विठ्ठलवाडी (कॉरिडॉर २-ब) या विस्तारीत मार्गांचा समावेश असेल.

दोन्ही उन्नत मार्ग १२.७५ किमी लांबीचे असून त्यामध्ये १३ मेट्रो स्थानके असतील. या विस्तारीकरणामुळे वेगाने विकसीत होणारे बावधन, कोथरूड, खराडी आणि वाघोली ही उपनगरे मेट्रो सेवेशी जोडली जातील. हा प्रकल्प चार वर्षांत पूर्ण होणे अपेक्षित आहे. हा प्रकल्पामध्ये केंद्र सरकार व राज्य सरकार आणि आंतरराष्ट्रीय द्विपक्षीय/बहुपक्षीय एजन्सींची समान गुंतवणूक असेल. या प्रकल्पामुळे पुण्यातील पूर्व-पश्चिम सार्वजनिक वाहतूक मजबूत होऊ शकेल.देशात आणीबाणी लागू केल्याच्या घटनेला बुधवारी ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त केंद्रीय मंत्रिमंडळाने आणीबाणीचा निषेध करणारा ठराव संमत केला. "आजच्या पिढीने आणीबाणीच्या काळातील दडपशाही पाहिलेली नाही. म्हणूनच आणीबाणीचे धोके काय असतात, याची माहिती तरुण पिढीपर्यंत पोहोचवली पाहिजे. देशात मजबूत लोकशाही व्यवस्था सुनिश्चित करणे हे आपले कर्तव्य आहे," असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बैठकीमध्ये व्यक्त केल्याचे समजते. गेल्या वर्षी भाजपने २५ जूनला संविधान हत्यादिन पाळण्याचा ठराव संमत करण्यात आला होता. त्यानुसार, बुधवारी देशभर बुधवारी संविधान हत्यादिन पाळण्यात आला. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये दोन मिनिटांचे मौन बाळगण्यात आलेया विस्तारीकरणामुळे वेगाने विकसीत होणारे बावधन, कोथरूड, खराडी आणि वाघोली ही उपनगरे मेट्रो सेवेशी जोडली जातील. हा प्रकल्प चार वर्षांत पूर्ण होणे अपेक्षित आहे. हा प्रकल्पामध्ये केंद्र सरकार व राज्य सरकार आणि आंतरराष्ट्रीय द्विपक्षीय/बहुपक्षीय एजन्सींची समान गुंतवणूक असेल. या प्रकल्पामुळे पुण्यातील पूर्व-पश्चिम सार्वजनिक वाहतूक मजबूत होऊ शकेल.देशात आणीबाणी लागू केल्याच्या घटनेला बुधवारी ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त केंद्रीय मंत्रिमंडळाने आणीबाणीचा निषेध करणारा ठराव संमत केला. "आजच्या पिढीने आणीबाणीच्या काळातील दडपशाही पाहिलेली नाही. म्हणूनच आणीबाणीचे धोके काय असतात, याची माहिती तरुण पिढीपर्यंत पोहोचवली पाहिजे. देशात मजबूत लोकशाही व्यवस्था सुनिश्चित करणे हे आपले कर्तव्य आहे," असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बैठकीमध्ये व्यक्त केल्याचे समजते. गेल्या वर्षी भाजपने २५ जूनला संविधान हत्यादिन पाळण्याचा ठराव संमत करण्यात आला होता. त्यानुसार, बुधवारी देशभर बुधवारी संविधान हत्यादिन पाळण्यात आला.

आणीबाणीच्या निषेधाचा ठराव

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये दोन मिनिटांचे मौन बाळगण्यात आले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये ३ हजार ६२६ कोटींच्या पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी देण्यात आली. हा टप्पा वनाझ-रामवाडी या पहिल्या टप्प्याचे विस्तारीकरण असेल. त्यामध्ये वनाझ ते चांदणी चौक (कॉरिडॉर २-अ) आणि रामवाडी ते वाघोली/विठ्ठलवाडी (कॉरिडॉर २-ब) या विस्तारीत मार्गांचा समावेश असेल.आणीबाणीचे धोके काय असतात, याची माहिती तरुण पिढीपर्यंत पोहोचवली पाहिजे. देशात मजबूत लोकशाही व्यवस्था सुनिश्चित करणे हे आपले कर्तव्य आहे.

हवाई दलाच्या हद्दीतील २४ इमारतींवर कारवाई

24 बेकायदा इमारती पाडून, 48 हजार चौरसमीटर क्षेत्र रिकामे केले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

हवाई दलाच्या हद्दीतील बेकायदा २४ इमारतींवर कारवाई करून महापालिकेने सुमारे ४८ हजार चौरसमीटर क्षेत्र रिकामे केले. लोहगाव नवीन हद्दीमध्ये हवाई दलाने प्रतिबंधित केलेल्या ९०० मीटरच्या बॉम्बे डंप भागात उभारण्यात आलेल्या इमारतींवर ही कारवाई करण्यात आली.

हवाई दलाच्या हद्दीत झालेल्या बेकायदा बांधकामांचे तातडीने सर्वेक्षण करुन त्याचा अहवाल न्यायालयात सादर करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वी पुणे महापालिकेला दिले आहेत. यानंतर जागे झालेल्या बांधकाम विभागाने या भागातील २४ बेकायदा इमारती पाडून टाकून सुमारे ४८ हजार चौरसमीटर क्षेत्र रिकामे केले. विशेष म्हणजे ही सर्व बांधकामे तीन ते चार मजल्यांपर्यंत पूर्ण झालेली होती. मग इतके दिवस बेकायदा पद्धतीने सुरू असलेली ही बांधकामे महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या 'नजरेला' का पडली नाहीत, अशी जोरदार चर्चा या परिसरात सुरू झाली आहे.लोहगाव विमानतळ हे संरक्षण विभागाचे प्रमुख केंद्र आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने हे विमानतळ महत्त्वाचे आहे. विमानतळाच्या परिसरात बांधकामे होऊ नयेत, यासाठी केंद्र सरकारची नियमावली आहे. या भागात बेकायदा बांधकामे होत असून, महापालिका त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याची तक्रार उच्च न्यायालयात करण्यात आली होती. त्याची दखल घेऊन न्यायालयाने महापालिकेला तातडीने विमानतळ परिसरात झालेल्या बांधकामांचे सर्वेक्षण करुन त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. यानंतर महापालिकेच्या बांधकाम विभागाला जाग आली आणि कारवाईला सुरुवात झाली. या भागातील २४ इमारतींना महपालिकेने नोटीस बजावली होती. त्यावर मंगळवारी धडक कारवाई करून ही बांधकामे पाडून टाकण्यात आली. यामध्ये जेसीबी, जॉ कटर या मशिनचा वापर करण्यात आला आहे. बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस. एम. साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली उप अभियंता इरफान शेख, सौरभ खुराड यांच्या सह बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी, पोलिस या कारवाईत सहभागी झाले होते. हवाई दलाने बंदी घातलेल्या क्षेत्रात बेकायदा बांधकामे करण्यात आल्याचे समोर आले होते. २४ इमारतींना बांधकाम विभागाने नोटीस बजाविली होती. त्यावर कारवाई करून इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या. हवाई दलाच्या हद्दीत झालेल्या बेकायदा बांधकामांचे तातडीने सर्वेक्षण करुन त्याचा अहवाल न्यायालयात सादर करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वी पुणे महापालिकेला दिले आहेत. यानंतर जागे झालेल्या बांधकाम विभागाने या भागातील २४ बेकायदा इमारती पाडून टाकून सुमारे ४८ हजार चौरसमीटर क्षेत्र रिकामे केले.

सर्व बांधकामे तीन ते चार मजल्यांपर्यंत

विशेष म्हणजे ही सर्व बांधकामे तीन ते चार मजल्यांपर्यंत पूर्ण झालेली होती. मग इतके दिवस बेकायदा पद्धतीने सुरू असलेली ही बांधकामे महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या 'नजरेला' का पडली नाहीत, अशी जोरदार चर्चा या परिसरात सुरू झाली आहे.लोहगाव विमानतळ हे संरक्षण विभागाचे प्रमुख केंद्र आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने हे विमानतळ महत्त्वाचे आहे.

1 जुलैपासून पालिका आकारणार 2 टक्के विलंब शुल्क

सव्वातीन लाख करदात्यांनी घेतला सवलतीचा लाभ!

तब्बल 408 कोटी 73 लाख रुपयांचे कर संकलन

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्ताधारकांसाठी महापालिकेने ३० जून २०२५ पर्यंत विविध कर सवलती जाहीर केल्या आहेत. आतापर्यंत जवळपास सव्वा तीन लाख नागरिकांनी य सवलतींचा लाभ घेतला आहे. आता या सवलतींचा लाभ घेण्यासाठी अवघे पाच दिवस शिल्लक असून नागरिकांनी चालू आर्थिक वर्षातील तसेच थकीत कर भरावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने मालमत्ता धारकांसाठी ३० जून २०२५ पर्यंत संपूर्ण कराचा भरणा ऑनलाइन स्वरूपात केल्यास १० टक्के सवलत व कुटुंबातील महिलेच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेवर ३० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येत आहे. यासोबतच, आतापर्यंत ३२ हजार ५०५ थकबाकीदारांना जप्तीपूर्वीची नोटीस देखील बजाविण्यात आली आहे.

१ एप्रिल २०२५ पासून आतापर्यंत सुमारे ३ लाख १८ हजार मालमत्ताधारकांनी आपला कर भरून विविध सवलतींचा लाभ घेतला आहे. यामुळे चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत तब्बल ४०८ कोटी ७३ लाख रुपयांचा कर संकलित झाला आहे. यामध्ये १० टक्के सवलतीचा लाभ घेणाऱ्या मालमत्ताधारकांची संख्या जवळपास २ लाख ३२ हजार ७६ असून त्यांनी ऑनलाईन भरणा केलेल्या कराची रक्कम २४६.१८ कोटी आहे.

तसेच ज्या मालमत्ताधारकांनी धनादेशाद्वारे कराचा भरणा केला, परंतू त्यांचे धनादेश वटले नाहीत, अशा मालमत्तांवर लवकरच जप्तीची कारवाई केली जाणार आहे. यामध्ये न वटलेल्या धनादेशांची एकूण रक्कम ९ कोटी १५ लाख रुपये इतकी असून मालमत्ताधारकांनी ३० जूनपूर्वी आपला मालमत्ता कर ऑनलाईन किंवा रोख स्वरूपात भरावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

19 हजार 651 थकबाकीदारांकडून कर वसुली

करसंकलन विभागाने कर वसुलीसाठी विविध माध्यमातून जनजागृती केल्याने आतापर्यंत सुमारे १९ हजार ६५१ थकबाकीदारांकडून ४० कोटी ३३ लाखांचा करसंकलीत झाला आहे. त्यासोबतच ऑनलाइन कर भरणाऱ्यांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

> पिंपरी चिंचवड शहरातील करदात्यांनी सवलत योजनेस उत्तम प्रतिसाद दिला असून सवलतीचा लाभ घेतला आहे. परंतू अद्यापही ज्या मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला नाही, अशा मालमत्ताधारकांना सवलत घेण्याची शेवटची संधी आहे. त्याबरोबरच जे या तिमाहीमध्ये कराचा भरणा करणार नाहीत, अशा मालमत्ताधारकांच्या करावर पुढील महिन्यापासून विलंब दंड लागू होणार आहे. थकबाकीदारांच्या मालमत्ता सुध्दा जप्त करण्याची मोहिम हाती घेण्यात येणार आहे. नागरिकांनी तात्काळ कराचा भरणा करुन सवलतीचा लाभ घ्यावा.
>
> **-प्रदीप जांभळे पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

हिंजवडीचे आयटीयन्स दाखल करणार ऑफलाईन याचिका

हिंजवडीसह गावांचा महापालिकेत समावेशासाठी स्वाक्षरी मोहीम

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी चिंचवड : आयटी परिसरातील दैनंदिन समस्यांना आयटीयन्स आता पुरते वैतागले आहेत. अनेकदा मागणी करूनही ना समस्यांचे निराकरण होते, ना शेजारच्या महापालिकेत गावांचा समावेश होतो. त्यामुळे 'आयटीयन्स'नी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. यासाठी ऑनलाइन सह्यांची निर्णायक मोहीम राबवीत ते आयटीयन्स, रहिवाशांना भूमिका व्यक्त करायला सांगत आहेत.

आयटीयन्स'ची आता आक्रमक भूमिका

पहिल्या टप्प्यात सुमारे सात हजार स्वाक्षऱ्या पूर्ण झाल्यानंतर ही याचिका थेट मुख्यमंत्र्यांकडे सादर करण्यात येणार आहे. पुढील टप्प्यात नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांसह कोर्टात ऑफलाइन याचिका दाखल करून कायदेशीर लढा उभारण्याचाही मानस आयटीयन्स व्यक्त करीत आहेत. हिंजवडी परिसरात सक्षम आणि एकसंध प्रशासन यावे, नागरी समस्यांचा कायमचा निपटारा, मूलभूत नागरी सेवा सुधाराव्यात आणि नागरिकांचे जीवनमान सुलभ व्हावे, याकरिता राज्य सरकारने तत्काळ निर्णय घेऊन हिंजवडी परिसरातील गावे तत्काळ महापालिकेमध्ये समाविष्ट करावीत, अशी प्रमुख मागणी करण्यात येत आहे. याबाबत आयटीन्सचे प्रयत्न सुरू आहेत.

श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



सदाचरण परमार्थाचा पाया आहे

राम सहज हाती लागेल म्हणून जी काही साधने समर्थांनी सांगितली आहेत, त्यांमध्ये चांगल्या ग्रंथांचे वाचन हेही एक आहे. परंतु कोणत्याही ग्रंथाचे अगर पोथीचे वाचन करताना, केवळ काहीतरी वाचायचे म्हणून वाचन करू नये. अर्थ कळल्याशिवाय पोथी खरी वाचल्यासारखे नाही होणार; तसेच, जितका त्याचा अर्थ कळला तितके तरी कृतीत आणण्याचा प्रयत्न करावा. आपण जे करीत नाही ते प्रथम करायला सुरुवात करावी. भाराभर वाचले आणि कृती केली नाही, तर काय उपयोग ? चार मैलांचा रस्ता असला तर सबंध रस्ता एकदम दिसावा असे म्हटल्याने कसे होईल ? एक मैल रस्ता चालावा, म्हणजे पुढचे दिसेल. जसजशी मजल मारावी तसतसे पुढचे दिसू लागेल. परमार्थाचेही असेच आहे. बापासारख्या मिशा मला याव्या म्हणून लहान मुलाने हट्ट धरला तर कसे होईल ? त्याचप्रमाणे, आजच मला देवदर्शन व्हावे म्हटले तर कसे होईल ? सद्गुरूची आज्ञा पाळावी, साधन करू लागावे, म्हणजे सर्व काही होते. जेवायला बसले म्हणजे पोट भरायचे राहते का ? खरोखर परमार्थाची वाट अगदी सरळ आहे; प्रपंचाचा रस्ता मात्र डोंगराळ असून काटेकुटे यांनी भरलेला आहे. आपला प्रपंच हा परमार्थाच्या सोयीसाठी असायला पाहिजे. पण याच्या उलट, आपला परमार्थच मुळी आपल्या प्रपंचाच्या सोयीसाठी आपण केला आहे. कुंपणाने शेत खावे तसे आपले झाले आहे. शेताला कुंपणाची जरूरी आहे; नाहीतर ढोरे आत येऊन शेत फस्त करतील. पण कुंपणच जर बेसुमार वाढले, तर त्यामुळे शेताचे नुकसान होते हे जाणले पाहिजे. ज्याने व्यवहार तपासून केला, त्याला परमार्थ साधलाच. परमार्थ हा साखरेसारखा आहे. आपण साखरेचे कारले जरी केले तरी ते खायला गोडच लागते, तसे प्रपंचातसुद्धा परमार्थ केला तरीही तो गोडच असतो. परमार्थ हा आपल्यासाठीच असल्याने तो आपल्याला शक्य आहे किंवा नाही हे विचार करून पहावे; आणि तो आपल्याला शक्य आहे असे जर पटले, तर मात्र केल्याशिवाय राहू नये.

पोटात अन्न घालण्यासाठी जसे तोंड, त्याचप्रमाणे परमार्थाला सदाचरण आवश्यक आहे. सदाचरण हा परमार्थाचा पाया आहे. पाया म्हणजे काही घर नव्हे, परंतु पायाशिवाय मात्र घर नव्हे, हे देखील तितकेच खरे. आपण स्वत:च्या मुलाला जसे प्रेमाने घेतो तसा परमार्थ करावा; आणि आपण दुसऱ्याच्या मुलाला जसे घेतो तसा प्रपंच करावा. भगवंताच्या स्मरणात प्रपंच सुखाचा करणे हाच खरा परमार्थ, आणि ज्याची वृत्ती सुधारून भगवंताकडे लागली त्यालाच खरा परमार्थ कळला.

बोधवचन:- भगवंतावर अकारण प्रेम करणे याचे नाव परमार्थ.

'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

ट्रम्पतात्या अत्यंत हुशार, का प्रचंड अहंकारी अन् भंपक !

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी दुसऱ्यांदा विराजमान झालेले डोनाल्ड ट्रम्प यांचे व्यक्तिमत्त्व आता प्रचंड गूढ वाटू लागले आहे. इतके की, पूर्वीचे ट्रम्प आणि आत्ताचे ट्रम्प यामध्ये जमीन-आसमानचा फरक जाणवतो आहे. मधल्या काळात सत्ता गेल्यामुळे असेल किंवा त्यांना संपूर्ण जगातून मिळालेल्या वागणुकीमुळे असेल, पण हे गूढ व्यक्तिमत्व दिवसेंदिवस अत्यंत अहंकारी आणि हुकूमशाही पद्धतीने वागत आहे, हे मात्र नक्की !

संपूर्ण जग पाहिजे मुठीत!

अमेरिका ही महासत्ता आहे, हे संपूर्ण जगाने पूर्वीपासूनच मान्य केले आहे. पण दोन देशांमध्ये झुंज लावायची आणि नंतर ती सोडवायची असा नवा उद्योग डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरू केला आहे की काय, असे वाटू लागले आहे. दोन देशांमधील लढाई किंवा संघर्ष मीच थांबवला, असे म्हणण्याची त्यांची घाई असते. पण, त्याला यश येत नसते. ट्रम्प यांनी सांगितले म्हणून संघर्ष थांबला, हे मान्य करायला कोणतेच देश तयार नाहीत. संपूर्ण जगाने आपल्या पंखाखाली राहावे आणि आपले निर्णय ऐकून त्यांना मुठीत ठेवावे, असे ट्रम्प यांना वाटत असावे..

रशिया, युक्रेनने झिडकारले..

गेले सुमारे तीन वर्षे रशिया आणि युक्रेनचे युद्ध सुरू आहे. ते थांबवण्यासाठी प्रयत्न केला, पण त्या दोन्ही देशांनी ट्रम्प यांचा प्रस्ताव झिडकरला. युक्रेनच्या अध्यक्षांनी तर ट्रम्प यांची पत्रकार परिषदेत चेष्टा केली आणि रशियाचे अध्यक्ष त्यांना जुमानत नाहीत. त्यानंतर झाला तो भारत-पाकिस्तान संघर्ष ! त्यावेळी सुद्धा ट्रम्प यांनी परस्पर युद्धविरामाची घोषणा केली. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी दोन्ही देशांना विचारूनच तो निर्णय घेतला. पण, त्यामुळे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी चांगले अडचणीत आले. त्यानंतर आताचा इस्रायलआणि इराण यांच्यातील संघर्ष ! ही लढाई सुद्धा थांबल्याची घोषणा ट्रम्प यांनीच केली. प्रत्यक्षात इराण किंवा इस्रायलने न थांबता एकमेकांवरील क्षेपणास्त्र हल्ले सुरूच ठेवले आहेत.

ट्रम्प तोंडावर आपटले..

ट्रम्प यांची एकूण भूमिका पाहून जगात शांतता नांदवायचा त्यांचा प्रयत्न हा नोबेल पुरस्कारासाठी आहे की काय असे अनेकांना वाटते. तथापि, इराणच्या युद्धबंदीमध्ये मात्र ते तोंडावर आपटले आहेत. आपण एक महान शांतीचे पुरस्कर्ते नेते आहोत, हे दाखवून देण्याचा ट्रम्प यांचा प्रयत्न असतो. पण, या प्रयत्नात पुन्हा एकदा त्यांच्या नेतृत्वाचा पोकळपणा दिसून आला आहे. इराणने त्यांना जागा दाखवून दिली आहे. त्यामुळे ट्रम्प हे एक तर अत्यंत हुशार असावेत किंवा बिनडोक आणि भंपक असावेत, असे आता संपूर्ण जगाला वाटू लागले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांची विश्वासार्हता..

अमेरिका हा जगातील सुपरपॉवर देश आहे. पण, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे वर्तन मात्र प्रतिमेला अजिबात साजेसे नसते. पुन्हा एकदा डोनाल्ड ट्रम्प यांच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह लागले आहे. गरजेपेक्षा जास्त बोलण्याची किंवा बडबड करण्याची सवय आणि श्रेय घेण्याची हाव यामुळे ट्रम्प पुन्हा एकदा तोंडावर पडले आहेत. भारत-पाकिस्तानच्या बाबतीत जे त्यांनी केले, तेच आता इराण-इस्रायलच्या बाबतीत केले आहे. ट्रम्प यांनी सोशल मीडियावर इराण-इस्रायलमध्ये सीजफायर झाल्याची घोषणा केली. आपण हे युद्ध थांबवले, असा त्यांचा दावा होता. पण, पुन्हा हल्ले सुरु झाले आहेत. त्यामुळे ट्रम्प यांचा दावा किती निराधार, खोटा आहे, ते सिद्ध झाले आहे. इराणने पुन्हा एकदा इस्रायलवर मिसाईल हल्ला केला आहे आणि ट्रम्प यांना कळविले आहे.

इराणकडून मिसाईलचा पाऊस..

दुसरीकडे, इराणने पुन्हा एकदा इस्रायलवर मिसाईलचा पाऊस पाडला. इराण फक्त इस्रायलवर मिसाईलच डागत नाही, तर अमेरिकासुद्धा त्यांचे टार्गेट आहे. मध्य-पूर्वेमधील अमेरिकेच्या ठिकाणांवर मिसाईल हल्ले सुरु आहेत. आधी कतार, मग इराकमधील अमेरिकेच्या तीन ठिकाणांवर मिसाईल हल्ले झाले आहेत. या हल्ल्यांवरुन इराणचा इरादा किती मजबूत आहे, ते दिसून येतते. मध्य पूर्वेतील हा तणाव आणखी वाढू शकतो, हे स्पष्ट आहे.

मिसाईल्स हवेतच नष्ट..

इराणच्या हल्ल्यानंतर इस्रायलच्या अनेक शहरांमध्ये सायरन वाजत आहेत. लोक बंकर्सच्या दिशेने पळत आहेत. इराणने कतारमधील अमेरिकेच्या अल-उदीद एअरबेसवर मिसाईल हल्ला केला. त्यांनी एकाचवेळी अनेक मिसाईल्स डागली. पण, अमेरिकेने बुहतांश मिसाईल्स हवेतच नष्ट केली. सध्या तरी कुठले नुकसान झाल्याचे वृत्त नाही. अल उदीद एअर बेस मध्य-पूर्वेमधील अमेरिकन सेंट्रल कमांडच्या एअर ऑपरेशन्सच मुख्यालय आहे.

इराणचा सुप्रीम लीडर काय म्हणतो?

इराणचे सुप्रीम लीडर आयातुल्लाह खामेनेई यांनी 'एक्स' वर एक पोस्ट शेअर केली आहे. त्यात त्यांनी लिहिले आहे की, 'आम्ही कुठल्याही परिस्थितीत हल्ला सहन करणार नाही. आम्ही कोणासमोर झुकणार नाही.इराण अमेरिकेच्या कुठल्याही हल्ल्याला प्रत्युत्तर द्यायला तयार आहे.'

अमेरिकेची दादागिरी किती दिवस?

ताकदीच्या आणि पैशाच्या जोरावर संपूर्ण जगावर दादागिरी करण्याचे डोनाल्ड ट्रम्प यांचे मनसुबे असून त्याला हळूहळू कोणी जुमानत नाही अशी अवस्था आहे. जे सर्वसामान्याला समजते, ते ट्रम्प यांना समजत नसेल का?

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

रस्ते मंडळाच्या व्यवस्थापनाची चौकशी!

अजित पवारांची एकनाथ शिंदे यांच्यावर कुरघोडी

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

शक्तिपीठ मार्गासाठी 'हुडको' कडून घेण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याजाचे प्रमाण दोन टक्के अधिक असल्याने आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाही, असा स्पष्ट अभिप्राय वित्त विभागाने देऊनही महागड्या कर्जाचा मार्ग सरकारने स्वीकारला आहे. दुसरीकडे, शक्तिपीठ मार्ग उभारणाऱ्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडील सुरू असलेले प्रकल्प व त्याची आर्थिक देणी लक्षात घेता महामंडळाच्या आर्थिक व्यवस्थापनाची स्वतंत्रपणे पडताळणी करण्याची आवश्यकता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडील नियोजन विभागाने करून दुसरे उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे मंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर एक प्रकारे कुरघोडीच केली आहे.

शक्तिपीठ मार्गासाठी २०,७८७ कोटी रुपयांच्या खर्चाला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिष्ठेच्या केलेल्या या प्रकल्पावरून एकनाथ शिंदे व अजित पवार या दोन उपमुख्यमंत्र्यांच्या खात्यांमध्ये परस्परांवर कुरघोडी करण्याची संधी सोडलेली नाही. शिंदे यांच्याकडे असलेल्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या कारभारावरून अनेकदा टीका, आरोप झाले आहेत.रस्ते विकास मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी असताना राधेशाम मोपलवार यांनी कोट्यवधी रुपयांची बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याचा आरोप विधानसभेतच झाला होता. मोठ्या प्रकल्पांसाठी किंमती फुगवून निविदा काढल्या जात असल्याची अनेकदा चर्चा होते. रस्ते विकास मंहामंडळाच्या कारभारावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी (कॅग) ताशेरे ओढले होते. अशा या रस्ते विकास महामंडळाच्या आर्थिक व्यवस्थापनाचे स्वतंत्रपणे परीक्षण वा पडताळणी करण्याची सूचना नियोजन विभागाने केली आहे.महामंडळाने हाती घेतलेल्या प्रकल्पांमुळे देणी वाढत असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे. अजित पवारांकडील नियोजन विभागाने एकनाथ शिंदे यांच्याकडील रस्ते विकास महामंडळाच्या आर्थिक कारभाराची चौकशी अथवा पडताळणी करण्याची भूमिका मांडून शिंदे यांना शह दिल्याचे मानले जाते. निधी वाटपावरून शिवसेनेच्या मंत्र्यांचा अजित पवारांवर आक्षेप असतो. त्यातच अजितदादांच्या खात्याने थेट शिंदे यांच्या खात्याची स्वतंत्रपणे पडताळणी करण्याची भूमिका मांडून शिवसेनेच्या जखमेवर मीठ चोळल्याचे मानले जाते.रस्ते विकास महामंडळासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात १,४५७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सबब प्रकल्पांचे प्राधान्यक्रम ठरवून प्रकल्प व्यवस्थापन आणि आर्थिक रचनेसह योग्य वित्तीय नियोजन करण्याचा सल्ला नियोजन विभागाने रस्ते विकास मंडळाला दिला आहे. एकनाथ शिंदे यांच्या खात्याला एक प्रकारे आर्थिक शिस्तीचा सल्ला देण्यात आला आहे.शक्तिपीठसाठी महागडे कर्ज नागपूर ते गोवा या शक्तिपीठ महामार्गासाठी हुडकोने १२ हजार कोटींचे कर्ज मंजूर केले आहे. खुल्या बाजारातून राज्य शासनाने ६.७५ टक्के व्याजदराने कर्जाची उभारणी केली होती. हुडकोचा व्याजदर ८.८५ टक्के आहे. खुल्या बाजारातील कर्ज आणि हुडकोचे कर्ज यांच्या दरात २ टक्क्यांचा फरक आहे.

राज्यावर आधीच कर्जाचा बोजा

राज्यावर आधीच ९ लाख ३२ हजार कोटींच्या कर्जाचा बोजा आर्थिक वर्षाअखेर होण्याचा अंदाज आहे. यंदाच्या आर्थिक वर्षात १ लाख ५४ हजार कोटींची रक्कम व्याजापोटी खर्च करावी लागणार आहे. याचमुळे शक्तिपीठसाठी ८.८५ टक्के व्याजाजा दर हा आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाही, असा अभिप्राय नियोजन विभागाने व्यक्त केला आहे. कर्जाचा वाढता बोजा व त्यातच वित्तीय नियोजन बिघडल्यास राजकोषीय तूट तीन टक्क्यांपेक्षा अधिक तसेच कर्जाचे प्रमाण सकल राज्य उत्पन्नाच्या २५ टक्क्यांच्या मर्यादिपलीकडे जाऊ शकते, असा गंभीर इशारा देण्यात आला आहे.रस्ते विकास महामंडळ आणि सार्वजिनक बांधकाम विभागांकडून मोठे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. हे प्रकल्प राबविताना वित्तीय नियोजनाबाबत वित्त व नियोजन विभागाने वारंवार चिंता व्यक्त करूनही फरक पडलेला नाही.

अलमट्टीतील पाणीसाठा ६२ टक्क्यावर

जलसंपदाचे 32 अधिकारी निरीक्षणासाठी नियुक्त

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

जून महिन्यातच कर्नाटकातील अलमट्टी धरणातील पाणीसाठा ६२ टक्क्यांवर पोहचल्याने सांगली जलसंपदा विभागाचे ३२ अधिकारी अलमट्टीसह हिप्परगी बंधाऱ्यातील पाणी साठ्यावर लक्ष ठेवण्यासाठी नियुक्त करण्यात आले आहेत. हे अधिकारी पावसाळी हंगाम संपेपर्यंत जलसाठ्यावर नजर ठेवणार आहेत.

कृष्णा नदीवर कर्नाटकात बांधण्यात आलेल्या अलमट्टी धरणातील जलसाठ्यामुळे सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णा नदीच्या पाण्याला फूगवटा येत असून, यामुळे मोठ्या प्रमाणात पूरहानी होते असा आक्षेप घेतला जात आहे. महापुराच्या पाण्याचा निचरा होत नसल्याने सांगली जिल्ह्यातील वारणा व कृष्णा नदीकाठच्या १०४ गावांना हानी पोहचते. तसेच सांगलीलाही मोठा फटका बसतो. यंदाच्या हंगामात मान्सूनपूर्व मोठ्या प्रमाणात झाल्याने आणि पश्चिम घाटात संततधार असल्याने नदीतील पाण्याची पातळी जूनमध्येच वाढती आहे.

कृष्णा, वारणा, पंचगंगा पाण्याची आवक जास्त असल्याने बुधवारी सकाळपर्यंत अलमट्टी धरणात पाणीसाठा ७६.५९ टीएमसी म्हणजेच ६२ टक्के पाणीसाठा झाला असून, महत्तम जलसाठा संचय पातळी ५१९.६० मीटर असताना आजची पातळी ५१६.३३ मीटर आहे. धरणातील पाण्याची आवक ७० हजार ४३५ क्युसेक असून, विसर्गही तेवढाच आहे.अद्याप मान्सूनचे हंगामाचे तीन महिने शिल्लक असल्याने जलसाठा अधिक असल्याने सांगली, कोल्हापूरला महापुराचा धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पूरनियंत्रण करण्यासाठी उभय राज्यामध्ये समन्वय असला तरी अलमट्टी, हिप्परगी येथील पाण्याची आवक, विसर्ग यावर लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक ठिकाणी १६ असे ३२ अधिकारी जलसंपदा विभागाने तैनात केले आहेत. हे अधिकारी प्रत्येक तासाला अलमट्टी, हिंप्परगी बॅरेजवरील स्थितीची माहिती सांगलीत पूर नियंत्रण कक्षाला कळवणार आहेत.

सांगलीला मोठा फटका

कृष्णा नदीवर कर्नाटकात बांधण्यात आलेल्या अलमट्टी धरणातील जलसाठ्यामुळे सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णा नदीच्या पाण्याला फूगवटा येत असून, यामुळे मोठ्या प्रमाणात पूरहानी होते असा आक्षेप घेतला जात आहे. महापुराच्या पाण्याचा निचरा होत नसल्याने सांगली जिल्ह्यातील वारणा व कृष्णा नदीकाठच्या १०४ गावांना हानी पोहचते. तसेच सांगलीलाही मोठा फटका बसतो. यंदाच्या हंगामात मान्सूनपूर्व मोठ्या प्रमाणात झाल्याने आणि पश्चिम घाटात संततधार असल्याने नदीतील पाण्याची पातळी जूनमध्येच वाढती आहे. कृष्णा, वारणा, पंचगंगा पाण्याची आवक जास्त असल्याने बुधवारी सकाळपर्यंत अलमट्टी धरणात पाणीसाठा ७६.५९ टीएमसी म्हणजेच ६२ टक्के पाणीसाठा झाला असून, महत्तम जलसाठा संचय पातळी ५१९.६० मीटर असताना आजची पातळी ५१६.३३ मीटर आहे.

41 वर्षांनी भारत पुन्हा अवकाशात!

राकेश शर्मानंतर शुभांशू शुक्ला यांनी अवकाशात झेप घेतली

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

भारताच्या हवाई दलातील ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्यासह चार अंतराळवीर बुधवारी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाकडे रवाना झाले. भारताच्या राकेश शर्मा यांच्यानंतर ४१ वर्षांनी शुभांशू शुक्ला यांनी अवकाशात झेप घेतली. 'माझ्या देशबंधूंनो, ४१ वर्षांनी आपण (भारत) अवकाशात पुन्हा पोहोचलो. हा प्रवास खूपच छान झाला.' पृथ्वीपासून २०० किलोमीटर अंतरावरील कक्षेत 'ड्रॅगन' अवकाशकुपी नेल्यानंतर शुक्ला यांनी हे उद्गार काढले. तर मला या क्षणी काहीही म्हणायचे नाही. मी फार आनंदी आहे, अशी प्रतिक्रिया शुभांशू यांच्या मातोश्री आशा शुक्ला यांनी दिली.

'ॲक्सिऑम-४' मोहिमेंतर्गत 'स्पेस एक्स'चे 'फाल्कन-९' रॉकेट फ्लोरिडामधील केनेडी अवकाश केंद्रातून अंतराळवीरांना घेऊन भारतीय स्थानिक वेळेनुसार दुपारी १२.०१ मिनिटांनी उडाले. या मोहिमेचे सारथ्य ग्रुप कॅप्टन शुक्ला करीत असून, मोहिमेचे नेतृत्व 'नासा'च्या पेगी व्हाइट्सन करीत आहेत. अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाकडे जातील. आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात २८ तासांचा प्रवास करून गुरुवारी सायंकाळी ४.३० वाजता अंतराळवीर पोहोचतील. अंतराळवीर अवकाश स्थानकात १४ दिवस राहतील आणि ६० प्रयोग करतील.'ॲक्सिऑम स्पेस'च्या व्यावसायिक मोहिमेंतर्गत हे उड्डाण होत आहे. उड्डाणानंतर १० मिनिटांनी अंतराळवीर पृथ्वीभोवती कक्षेत फिरायला लागले. कक्षेत स्थिर झाल्यानंतर अंतराळवीरांनी त्यांच्या अवकाशकुपीचे 'ग्रेस' नाव जाहीर केले. या वेळी शुक्ला यांनी अवकाशात ४१ वर्षांनी भारतीय पुन्हा पोहोचल्याची घोषणा केली. हा प्रवास १.४ अब्ज भारतीयांचा आहे, अशी प्रतिक्रिया ग्रुप कॅप्टन शुक्ला यांनी अवकाश प्रवासाला निघण्यापूर्वी दिली. अवकाश स्थानकावरील मुक्कामात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी ग्रुप कॅप्टन शुक्ला संवाद साधण्याची शक्यता आहे. दरम्यान, तांत्रिक आणि हवामानाच्या कारणांमुळे यापूर्वी हे उड्डाण पुढे ढकलावे लागले होते.'ॲक्सिऑम-४' मोहिमेत ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला, 'नासा'मधील अंतराळवीर आणि मोहिमेचे नेतृत्व सांभाळणाऱ्या पेगी व्हाइट्सन, पोलंडचे स्लावोझ उझनान्स्की आणि हंगेरीचे टिबर कापू हे अंतराळवीर आहेत. भारत १९८४ नंतर, पोलंड १९७८ नंतर आणि हंगेरी १९८० नंतर अवकाशात पुन्हा गेले आहेत. आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात जाणारे ग्रुप कॅप्टन शुक्ला हे पहिले भारतीय अंतराळवीर असतील. यापूर्वी राकेश शर्मा १९८४ मध्ये सोव्हिएत संघाच्या 'सॅल्यट-७' अवकाश केंद्रात होते. भारत, पोलंड, हंगेरी, अमेरिकेच्या अंतराळवीरांना घेऊन निघालेल्या अवकाश मोहिमेची सुरुवात यशस्वी झाल्याचे आम्ही स्वागत करतो. आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात जाणारे ग्रुप कॅप्टन शुक्ला हे पहिले भारतीय असतील. १.४ अब्ज भारतीयांच्या इच्छा, आशा त्यांच्याबरोबर आहेत. त्यांना, इतर अंतराळवीरांना शुभेच्छा.

अवकाशकुपीचे 'ग्रेस' नाव जाहीर

'ॲक्सिऑम-४' मोहिमेंतर्गत 'स्पेस एक्स'चे 'फाल्कन-९' रॉकेट फ्लोरिडामधील केनेडी अवकाश केंद्रातून अंतराळवीरांना घेऊन भारतीय स्थानिक वेळेनुसार दुपारी १२.०१ मिनिटांनी उडाले. या मोहिमेचे सारथ्य ग्रुप कॅप्टन शुक्ला करीत असून, मोहिमेचे नेतृत्व 'नासा'च्या पेगी व्हाइट्सन करीत आहेत. अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाकडे जातील. अंतराळवीर अवकाश स्थानकात १४ दिवस राहतील आणि ६० प्रयोग करतील.'ॲक्सिऑम स्पेस'च्या व्यावसायिक मोहिमेंतर्गत हे उड्डाण होत आहे. उड्डाणानंतर १० मिनिटांनी अंतराळवीर पृथ्वीभोवती कक्षेत फिरायला लागले. कक्षेत स्थिर झाल्यानंतर अंतराळवीरांनी त्यांच्या अवकाशकुपीचे 'ग्रेस' नाव जाहीर केले. या वेळी शुक्ला यांनी अवकाशात ४१ वर्षांनी भारतीय पुन्हा पोहोचल्याची घोषणा केली.

संरक्षण खर्चवाढीस मान्यता

'नेटो'चे सदस्य दरवर्षी जीडीपीच्या पाच टक्के योगदान देणार

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

'नेटो'च्या सदस्य देशांच्या नेत्यांनी संरक्षण खर्चात मोठी वाढ करण्याचे बुधवारी मान्य केले, तसेच एकमेकांचे संरक्षण करण्याचा निर्धारही व्यक्त केला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यासाठी 'नेटो'वर दबाव वाढवला होता. ट्रम्प यांच्यासह 'नेटो' संघटनेचे सदस्य देशांचे प्रतिनिधी नेदरलँड येथे शिखर परिषदेसाठी जमले आहेत.

"सदस्य देशांनी २०३५पर्यंत मुख्य संरक्षण खर्च तसेच संरक्षण व सुरक्षाविषयक खर्चात दरवर्षी जीडीपीच्या पाच टक्के गुंतवणूक करण्याचे मान्य केले आहे," असे 'नेटो'कडून सांगण्यात आले. संरक्षणावरील खर्चाचे उद्दिष्ट ठरवणे हा या शिखर परिषदेसमोरील मुख्य अजेंडा होता. त्यापूर्वी, संरक्षणासाठी जीडीपीच्या पाच टक्के रक्कम खर्च करण्यास संघटनेचे सदस्य राजी होतील, असा विश्वास 'नेटो'चे सरचिटणीस मार्क रुते यांनी व्यक्त केला होता.अमेरिकेने युरोपमधून इतर ठिकाणी आपले लक्ष वळवल्यामुळे ३२ देशांच्या 'नेटो' संघटनेमधील अन्य सदस्य देश संरक्षणावरील खर्च वाढवण्यास तयार होतील अशी अपेक्षा होती. तर, स्पेन, बेल्जियम या देशांनी संरक्षणावरील खर्चातील वाढीला नकार दर्शवला होता. युरोपातील अनेक देशांत आर्थिक आव्हाने असून, ट्रम्प यांच्या आयातशुल्क धोरणामुळे या देशांना संरक्षणावरील खर्चात वाढ करणे कठीण असल्याचे सांगितले जात होते.

मात्र, सर्व देशांनी संरक्षण खर्चात वाढीस मान्यता दिली. संरक्षणवाढीचा निर्णय होण्यापूर्वी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी 'नेटो' सदस्य देशांवर हल्ला झाला, तर अमेरिका कितपत मदतीला येईल, यावर साशंकता व्यक्त केली. सदस्य देश संरक्षणावरील खर्च किती करतात, यावर ते अवलंबून असेल, असे ट्रम्प म्हणाले. युरोपीय मित्रदेश आणि कॅनडाने जीडीपीच्या पाच टक्के रक्कम संरक्षणावर खर्च करावी.

आण्विक केंद्रांचे मोठे नुकसान

, असे त्यांनी सुचविले आहे. 'नेटो'च्या मूळ करारातील कलम ५ ची व्याख्या अनेक देश अनेक पद्धतीने करतात. मी त्याची अगदी अचूक व्याख्या करीन, असे ट्रम्प म्हणाले.हेग : अमेरिकेच्या हल्ल्यामध्ये इराणमधील आण्विक केंद्रांचे मोठे नुकसान झाल्याचा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी केला. मात्र, याच वेळी या संदर्भात उपलब्ध गुप्तवार्ता निर्णयाप्रत येण्याची नसल्याचेही त्यांनी मान्य केले. ट्रम्प म्हणाले, 'गुप्तचरांकडून आलेली माहिती निष्कर्षापर्यंत पोहोचण्याची नाही. 'आम्हाला माहीत नाही. नुकसान खूप मोठे असू शकते,' अशी माहिती आहे. त्यामुळे मला ती खरी वाटते. हल्ला विनाशकारी होता.' दरम्यान इराणचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माइल बघेई यांनीही केंद्राचे मोठे नुकसान झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला.

बॉयफ्रेंडबरोबर श्रद्धा कपूरने शेअर केला फोटो

बॉलीवूड अभिनेत्री श्रद्धा कपूर सध्या तिच्या 'स्त्री २' चित्रपटामुळे चांगलीच चर्चेत आहे. अभिनेत्रीने २०१३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आशिकी २' चित्रपटाद्वारे बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. तिच्या पहिल्या चित्रपटात श्रद्धाने अभिनेता आदित्य रॉय कपूरबरोबर स्क्रीन शेअर केली होती. अभिनेत्रीचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. गेल्या काही महिन्यांपासून सोशल मीडियावर श्रद्धाच्या वैयक्तिक आयुष्याबाबत चांगलीच चर्चा रंगली होती. श्रद्धा कपूर अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या जामनगर येथे पार पडलेल्या पहिल्या प्री-वेडिंग सोहळ्याला तिच्या कथित बॉयफ्रेंडबरोबर पोहोचली होती. एवढंच नव्हे तर श्रद्धा विमानतळावर आदित्य रॉय कपूर आणि राहुल मोदी यांची भेट घालून देतानाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. याशिवाय एका फोटोमध्ये श्रद्धाने गळ्यात 'R' अक्षर असलेलं पेंडंट घातलं होतं. यावरून अभिनेत्री राहुल मोदीला डेट करत असल्याच्या चर्चा सर्वत्र चालू झाल्या. परंतु, श्रद्धाने याबाबत कुठेही भाष्य केलं नव्हतं किंवा राहुलबरोबर एकही फोटो शेअर केला नव्हता. अशातच इन्स्टाग्राम स्टोरीवर राहुल अन् तिचा एकत्र फोटो शेअर करत श्रद्धाने तिच्या तमाम चाहत्यांना आश्चर्याचा सुखद धक्का दिला आहे.श्रद्धाने शेअर केलेल्या सेल्फी फोटोमध्ये हे दोघेही कॅमेराकडे बघून स्माइल देत असल्याचं पाहायला मिळत आहे. परंतु, अभिनेत्रीने या फोटोला काहीसं हटके कॅप्शन दिलं आहे. "दिल रख ले, नींद तो वापस दे दे यार" असं लिहित यापुढे श्रद्धाने हसण्याचे इमोजी जोडले आहेत. याशिवाय राहुलला तिने या पोस्टमध्ये टॅग सुद्धा केलं आहे. हा फोटो पाहिल्यावर श्रद्धाने प्रेमाची जाहीर कबुली देत त्यांच्या नात्यावर शिक्कामोर्तब केल्याच्या चर्चा आता सुरु झाल्या आहेत. श्रद्धाने हा सेल्फी फोटो शेअर करत याला "नींद चुराई मेरी किसने ओ सनम..." हे गाणं देखील लावलं आहे. राहुलच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर IMDB नुसार, राहुल मोदी 'प्यार का पंचनामा २', 'सोनू के टीटू की स्वीटी', 'तू झुठी में मक्कार' या चित्रपटांचा लेखक आहे. तसेच तो सहायक दिग्दर्शक म्हणून देखील काम करतो.दरम्यान, श्रद्धा कपूर आता लवकरच 'स्त्री २' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा बहुचर्चित चित्रपट येत्या १५ ऑगस्टला सर्व चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. यामध्ये श्रद्धा कपूरसह राजकुमार राव, अभिषेक बॅनर्जी, अपारशक्ती खुराना आणि पंकज त्रिपाठी यांच्या प्रमुख भूमिका असतील.

शत्रूवरही अशी वेळ येऊ नये : सुप्रिया पाठारे

मराठी मालिका आणि चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीस येणारी अभिनेत्री सुप्रिया पाठारे (SUPRIYA PATHARE) आणि तिचा मुलगा मिहीर पाठारे यांनी काही महिन्यांपूर्वी महाराज फास्ट फूड कॉर्नर या नावाच्या रेस्टॉरंट सुरु केलं. त्यांच्या या रेस्टॉरंटला खवय्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. पण काही कारणांमुळे हे हॉटेल काही दिवसांसाठी बंद करण्यात आलं होतं. अशताच हॉटेल बंद असताना कोणकोणत्या संकटांना समोरं जावं लागलं? याबद्दल सुप्रियानं नुकत्याच एका मुलाखतीमध्ये सांगितलं आहे. आता महाराजा हॉटेलला सुरुवात झाली आहे. पण दोन महिने हॉटेल बंद होतं. त्याचा बराच परिणाम झाला. कॅन्सरमुळे माझी आई गेली तसेच बरेच एकामोगून प्रसंग एक येत गेले. पहिल्यांदा हॉटेल जेव्हा बंद झालं तेव्हा स्टाफचं निघून गेला. मी नवीन हॉटेल सुरु करणाऱ्यांना

काजोलला जाणवायचा एकटेपणा

लोकप्रिय अभिनेत्री काजोल सध्या तिच्या 'माँ' या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये अभिनेत्री व्यग्र आहे. यानिमित्त तिने अनेक मुलाखती दिल्या. यातील एका मुलाखतीमध्ये अभिनेत्रीने तिच्या 'इश्क' या चित्रपटाबद्दल सांगितलं आहे. या चित्रपटात अभिनेता आमिर खान, जुही चावला, अजय देवगण आणि काजोल हे कलाकार मुख्य भूमिकेत झळकले होते. काजोलने या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यानचा तिचा अनुभव सांगितला आहे. १९९७ साली प्रदर्शित झालेल्या 'इश्क' या चित्रपटाचं दिग्दर्शन इंद्र कुमार यांनी केलं होतं. 'मॅशेबल इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये काजोल या चित्रपटाबद्दल म्हणाली, "आमिर खानची चित्रपटाच्या दिग्दर्शकाबरोबर खूप चांगली मैत्री झाली होती आणि आमिर व जुही यांची मैत्रीसुद्धा खूप घट्ट होती, त्यामुळे बऱ्याचदा हे तिघे एकत्र गप्पा मारत असायचे. कधी कधी जुही व आमिर एकत्र असायचे आणि मी व अजय एकटे असायचो. पण, अजयच्या तुलनेत मी जास्तच एकटी असायचे. मला खूप एकटं असल्याची जाणीव व्हायची. तेव्हाच अजय आणि मी एकमेकांशी बोलायला लागलो आणि आमच्यामध्ये संवाद वाढले."काजोल पुढे म्हणाली, "आम्ही ३०० दिवस या चित्रपटाचं चित्रीकरण करत होतो. चित्रपटाला बनायला ३०० दिवस लागले. आम्हाला काहीच कल्पना नाहीये की या चित्रपटासाठी एवढे दिवस का लागले. आम्ही दररोज ८-१० तास सेटवर असायचो त्यामुळे मी दिवसभर तर सगळ्यांशी बोलत बसू शकत नाही. जरी मला बोलण्याची खूप आवड असली तरी मला पण कधी कधी ब्रेकची गरज भासते.

6 आठवड्यांमध्ये घटवलेलं 'इतकं' वजन

सध्या आमिर खानची मुख्य भूमिका असलेल्या 'सितारे जमीन पर' चित्रपटाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे. या सिनेमाला बॉक्स ऑफिसवर सुद्धा चांगलं यश मिळत आहे. 'सितारे जमीन पर'मध्ये आमिरसह लोकप्रिय अभिनेत्री जिनिलीया देशमुख प्रमुख भूमिकेत झळकली आहे. जिनिलीयाचा सहज सुंदर अभिनय, तिची निरागसता या गोष्टी प्रेक्षकांना विशेष भावतात. त्यामुळेच अनेक वर्षांनी जिनिलीयाला बॉलीवूड सिनेमात झळकताना पाहून चाहत्यांनी आनंद व्यक्त केला आहे.जिनिलीया उत्तम अभिनेत्री आहेच पण, गेल्या काही वर्षांत या देशमुखांच्या सुनेने घराची व मुलांची संगोपनाची जबाबदारी सुद्धा निभावली. दोन्ही मुलांचा सांभाळ करण्यासाठी मध्यंतरी काही वर्षे तिने बॉलीवूडतून ब्रेक घेतला होता. लॉकडाऊनच्या काळात सोशल मीडिया रील्स व्हिडीओमुळे जिनिलीया पुन्हा एकदा चर्चेत आली. विशेषत: रितेश-जिनिलीयाच्या मजेशीर व्हिडीओजला चाहते भरभरून प्रतिसाद देऊ लागले. याचदरम्यान, जिनिलीयाच्या आणखी एका गोष्टीने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. ती गोष्ट म्हणजे तिचं ट्रान्सफॉर्मेशन! जिनिलीयाने फिटनेससाठी नेमकं काय केलं होतं पाहुयात...

लक्ष्मी निवास' मालिकेतील नायिकांचा जलवा!

'लक्ष्मी निवास' मालिकेत सध्या सिद्धू आणि भावनाची लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. २३ जून ते ३० जून या आठवड्याभरात प्रेक्षकांना मालिकेत सिद्धू-भावनाचा भव्य लग्नसोहळा पाहायला मिळणार आहे. सिद्धू लग्नानंतर भावनासह आनंदीचा देखील स्वीकार करणार आहे. लग्नघर असल्याने सध्या मालिकेतील सगळ्या नायिका सेटवर नटून-थटून शूट करत असल्याचं पाहायला मिळत आहे. शूटिंगमधून मोकळा वेळ मिळताच यापैकी काही अभिनेत्रींनी जुन्या सुपरहिट बॉलीवूड गाण्यावर डान्स केल्याचं पाहायला मिळत आहे. सिद्धूची मोठी वहिनी नीलांबरी गाडेपाटीलची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री कल्याणी जाधवने हा डान्स व्हिडीओ इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे.'लक्ष्मी निवास' मालिकेतील अभिनेत्रींनी १९८४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'शराबी' चित्रपटातील "इन्तेहाँ हो गई इंतजार की..." या गाण्यावर जबरदस्त डान्स केल्याचं या व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. हे गाणं किशोर कुमार व आशा भोसले यांनी गायलं असून बप्पी लहरी या गाण्याचे संगीत दिग्दर्शक होते.अमिताभ बच्चन यांच्यावर चित्रीत

झालेल्या "इन्तेहाँ हो गई इंतजार की..." या गाण्याला आता जवळपास ४१ वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र, आजही या गाण्याची लोकप्रियता कायम आहे. सध्या इन्स्टाग्राम रील्सवर हे गाणं तुफान ट्रेंड होत आहे. यामुळेच 'लक्ष्मी निवास' मालिकेतील अभिनेत्रींनी या ट्रेंडिंग गाण्यावर जबरदस्त डान्स करत खास व्हिडीओ शेअर केला आहे. पल्लवी वैद्य (सिद्धूची आई), पायल पांडे (वेंकीची पत्नी), तन्वी कोलते (सिद्धूची बहीण सिंचना), स्वाती देवल (भावनाची मोठी बहीण), जान्हवी तांबट (पूर्वी) आणि कल्याणी जाधव (सिद्धूची वहिनी) या ६ अभिनेत्रींनी मिळून अमिताभ बच्चन यांच्या गाण्यावर भन्नाट डान्स केला आहे. या सहा नायिकांसह मालिकेतील शांता आजी सुद्धा या व्हिडीओमध्ये थिरकल्या आहेत.दरम्यान, 'लक्ष्मी निवास' मालिकेतील अभिनेत्रींच्या डान्स व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे.

गोलंदाजांना पाठिंबा गरजेचा!

प्रत्येक सामन्यानंतर मत बदलणे अयोग्य;गंभीरचे वक्तव्य

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात दोन डावांत मिळून ८०० हून अधिक धावा करुनही अखेरीस पराभव पत्करण्याची नामुष्की भारतीय संघावर ओढवली. भारतीय गोलंदाजीतील मर्यादा या सामन्यातून अधोरेखित झाल्या. जसप्रीत बुमरा वगळता सर्वच वेगवान गोलंदाजांवर टीका झाली. मात्र, भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने गोलंदाजांची पाठराखण केली. भारतीय गोलंदाजीत सध्या अनुभवाची कमतरता असून त्यांना पाठिंबा देणे, त्यांच्यावर विश्वास राखणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे गंभीर म्हणाला.

लीड्स येथे झालेल्या पहिल्या कसोटीत इंग्लंडने चौथ्या डावात ३७१ धावांचा यशस्वी पाठलाग केला. बुमराचा अपवाद वगळता भारतीय गोलंदाजांनी निराशा केली. प्रसिध कृष्णाने दोन डावांत मिळून पाच गडी बाद केले, पण त्याला धावांवर नियंत्रण राखता आले नाही. पहिल्या डावात २० षटकांत १२८ धावा, तर दुसऱ्या डावात १५ डावांत ९२ धावा त्याने धावा खर्ची केल्या. मोहम्मद सिराजने प्रयत्न केले, पण त्यालाही फारसे यश मिळाले नाही. शार्दूल ठाकूरही अचूक टप्पा राखण्यात अपयशी ठरला."पूर्वी ४० हून अधिक कसोटी सामने खेळलेले तीन-चार गोलंदाज संघात असायचे. मात्र, आताचे चित्र वेगळे आहे. एकदिवसीय किंवा ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये अनुभव फारसा महत्त्वाचा ठरत नाही. मात्र, कसोटी क्रिकेटमध्ये,तेही ऑस्ट्रेलिया,इंग्लंड किंवा दक्षिण आफ्रिकेत खेळताना अनुभव निर्णायक ठरू शकतो," असे गंभीर म्हणाला."बहुतांश गोलंदाजांसाठी ही केवळ सुरुवात आहे. तुम्ही प्रत्येक सामन्यानंतर खेळाडूविषयीचे मत बदलण्यास सुरुवात केल्यास नव्या गोलंदाजांना घडवायचे कसे? बुमरा आणि सिराज वगळता आमच्या संघातील वेगवान गोलंदाजांना कसोटी क्रिकेटचा फारसा अनुभव नाही. मात्र, त्यांच्यात क्षमता आणि गुणवत्ता नक्कीच आहे. त्यामुळेच

ते ड्रेसिंग रुमचा भाग आहेत. त्यांच्यावर विश्वास दाखवणे, त्यांना पाठिंबा देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तुम्ही केवळ एका दौऱ्याचा विचार करू शकत नाही. आम्हाला असे वेगवान गोलंदाज तयार करायचे आहेत, जे येणाऱ्या वर्षांत भारताला सातत्याने कसोटी सामने जिंकवून देऊ शकतील," असे गंभीरने नमूद केले. सध्याच्या भारतीय संघाचा भाग असणाऱ्या वेगवान गोलंदाजांत बुमराने सर्वाधिक ४६ कसोटी सामने खेळले आहे. त्यापाठोपाठ सिराजचा (३७ सामने) क्रमांक लागतो. शार्दूलने १२ कसोटी सामने खेळले असले, तरी त्याला सातत्याने संधी मिळालेली नाही. प्रसिध (चार सामने), आकाश दीप (सात सामने), हर्षित राणा (दोन सामने) आणि अर्शदीप सिंग (एकही नाही) हे अन्य वेगवान गोलंदाज कसोटी क्रिकेटमध्ये नवखे आहेत. भारतीय संघाला दोन्ही डावांत तळाच्या फलंदाजांच्या अपयशाचा मोठा फटका बसला. भारताने पहिल्या डावात अखेरचे सात गडी ४१ धावांत, तर दुसऱ्या डावात अखेरचे सहा गडी ३१ धावांतच गमावले.त्यामुळे इंग्लंडला लढतीत पुनरागमन करता आले. "आमच्या तळाच्या फलंदाजांनी खेळपट्टीवर टिकण्याचा प्रयत्न केला नाही असे नाही. काही वेळा तुम्हाला अपयश येते आणि हे समजण्यासारखे आहे. आम्ही ज्याप्रकारे झटपट गडी गमावले ते निराशाजनक होते, पण अन्य कोणाहीपेक्षा आमचे खेळाडूच अधिक निराश आहेत. त्यानंतर आम्हाला लढतीत वर्चस्व राखता आले असते. मात्र, तसे झाले नाही. खेळाडू यातून शिकतील आणि आगामी सामन्यांत कामगिरी उंचावतील अशी आशा आहे," असे गंभीरने नमूद केले.पहिल्या कसोटीतील पराभवानंतरही बुमराबाबतच्या योजनेत बदल झालेला नसल्याचे गंभीरने स्पष्ट केले.आंतरराष्ट्रीय कारकीर्दीदरम्यान बुमराला विविध दुखापतींचा सामना करावा लागला आहे. यावर्षीच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेत बुमराच्या पाठीला दुखापत झाली. त्याला तीन महिन्यांहून अधिक काळ मैदानापासून दूर राहावे लागले. त्यामुळे कार्यभार व्यवस्थापनांतर्गत तो इंग्लंडविरुद्ध केवळ तीन सामने खेळणे नियोजित आहे. "आम्ही केवळ एका दौऱ्याचा विचार करू शकत नाही.

बुमराबाबतची योजना कायम

आगामी काळात आम्हाला बरेच क्रिकेट खेळायचे आहे. बुमराचे महत्त्व सर्वांनाच ठाऊक आहे. त्यामुळे आम्ही कोणताही धोका पत्करणार नाही. तो तीन कसोटी सामने खेळणार हे आधीच ठरले होते आणि तसेच होईल," असे गंभीर म्हणाला.लीड्स येथे झालेल्या पहिल्या कसोटीत इंग्लंडने चौथ्या डावात ३७१ धावांचा यशस्वी पाठलाग केला. बुमराचा अपवाद वगळता भारतीय गोलंदाजांनी निराशा केली. प्रसिध कृष्णाने दोन डावांत मिळून पाच गडी बाद केले, पण त्याला धावांवर नियंत्रण राखता आले नाही. पहिल्या डावात २० षटकांत १२८ धावा, तर दुसऱ्या डावात १५ डावांत ९२ धावा त्याने धावा खर्ची केल्या. मोहम्मद सिराजने प्रयत्न केले, पण त्यालाही फारसे यश मिळाले नाही. शार्दूल ठाकूरही अचूक टप्पा राखण्यात अपयशी ठरला.

रोहित शर्मा तर भलताच रोमँटिक!

क्रिकेटच्या मैदानावर बायकोला केलेलं सरप्राईज प्रपोज

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

भारतीय स्टार क्रिकेटपटू रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आणि त्यानंतर रोहित सध्या क्रिकेटच्या मैदानापासून दूर आहे. रोहित त्याची पत्नी रितिका सजदेहसह हरभजन सिंग आणि गीता बसराच्या 'व्हू इज द बॉस' या शोमध्ये आला होता. यादरम्यान त्याने पत्नी रितिकाला कसं प्रपोज केलं आणि त्यांची लव्हस्टोरी कशी होती हे सांगितलं.

हिटमॅनची लव्हस्टोरी एकदम फिल्मी आहे. त्याने रितिका सजदेहला आईस्क्रिम खाण्यासाठी जाऊया असं सांगितलं आणि मग तिला स्टेडियममध्ये नेत प्रपोज केलं होतं. रोहितने सांगितले की त्याने रितिकाला प्रपोज करण्यासाठी सुरूवातीला तिच्याशी खोट बोलत प्लॅनिंग केलं होतं. त्याने तिला आईस्क्रीम खायला नेण्याचं निमित्त केलं.यादरम्यान, रितिका त्याला आईस्क्रीम कुठे आहे हे विचारत राहिली. त्यादरम्यान, रोहितने तिला सांगितलं की तो तिला बोरिवलीतील एका ठिकाणी घेऊन जात आहे जिथे तो पूर्वी राहत होता. त्यानंतर रोहितने स्टेडियममधील मैदानावर गुडघ्यावर बसून रितिकाला प्रपोज केलं आणि रितिकानेही त्याचं प्रपोजल स्वीकारला.

रोहित शर्मा म्हणाला, "माझं प्रपोजल खूपच रोमँटिक होतं. मी १२ वर्षांचा असताना जिथे क्रिकेट खेळायला सुरूवात केली होती, तिथे घेऊन गेलो. रितिका घरून जेवण घेऊन आली होती, आम्ही ते जेवलो आणि तिला म्हणालो चल आईस्क्रिम खायला जाऊ, मला कंटाळा आलाय. मग आम्ही कारने निघालो. आम्ही मरीन ड्राईव्हच्या इथून गेलो."आम्ही हाजी अली, वरळी, दादर, वांद्रे ओलांडलं. ती मला सारखं विचारत होती की आईस्क्रीम कुठे आहे, तू मला कुठे घेऊन जातो आहेस. मी तिला सांगितलं की बोरिवलीमध्ये मी जिथे राहायचो तिथे एक चांगली जागा आहे. तू कधीच नाही गेली आहेस तिथे, चल मी तुला घेऊन जातो. तिने विचारलं की आईस्क्रिम खाण्यासाठी इतकं लांब का जायचंय", रोहित पुढे सांगताना म्हणाला.रोहितने रितिकाला कसं प्रपोज केलं हे सांगताना म्हणाला, "त्यानंतर आम्ही तिथे पोहोचलो, तिथे एक मैदान होतं. पूर्ण अंधार असल्यामुळे ते मैदान आहे याचा तिला अंदाज आला नाही. मी माझ्या मित्राला आधीच तिथे तयारी करून ठेवायला सांगितलं होतं आणि व्हीडिओ काढण्यासाठी सांगितलं होतं. आम्ही कार पार्क केली. बसून तिला प्रपोज केलं होतं."रोहित शर्मा सध्या क्रिकेटच्या मैदानापासून दूर असला तरी ऑगस्टमध्ये श्रीलंकेविरूद्धच्या वनडे सामन्यात तो खेळताना दिसणार आहे.

हिटमॅनची लव्हस्टोरी एकदम फिल्मी

रोहित शर्माने टी-२० वर्ल्डकप २०२४ च्या विजयानंतर टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. तर इंग्लंडविरूद्ध मालिकेपूर्वी त्याने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली.हिटमॅनची लव्हस्टोरी एकदम फिल्मी आहे. त्याने रितिका सजदेहला आईस्क्रिम खाण्यासाठी जाऊया असं सांगितलं आणि मग तिला स्टेडियममध्ये नेत प्रपोज केलं होतं.

महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। गुरुवार ।
। दि. 26 जून 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

माजी आ. विलास लांडे की माजी महापौर योगेश बहल?

महामंडळावर संधी कुणाला ?

माजी नगरसेवक अजित गव्हाणे यांच्या मागणीनंतर राष्ट्रवादीतील निष्ठावंत गट 'ॲक्टिव्ह'

चिंचवडमधून माजी विरोधी पक्षनेते नाना काटे समर्थकांच्याही आशा आता पल्लवीत

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे नेते, पदाधिकाऱ्यांना ताकद देण्याच्या दृष्टीने भाजपा- शिवसेना- राष्ट्रवादी महायुती सरकारच्या माध्यमातून विविध महामंडळांचे वाटप लवकरच करण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरात माजी आमदार विलास लांडे यांना श्रीक्षेत्र पंढरपूर येथे देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षपदी नियुक्ती करावी, अशी मागणी होत असतानाच आता माजी महापौर योगेश बहल यांनाही महत्त्वाच्या पदावर संधी मिळावी, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निष्ठावंत गटाने 'फिल्डिंग' लावली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होणार आहे. आगामी 4 महिन्यांत निवडणुका पूर्ण होतील. या निवडणुकीची रणनिती ठरवण्यासाठी मुंबईत बुधवारी समन्वय समितीची महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीमध्ये महामंडळांच्या नियुक्ती, विश्वस्त संस्थांच्या नियुक्ती निश्चित करण्याबाबत एकमत झाले आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी असे चित्र निर्माण झाले आहे. गेल्या आठवड्यामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये माजी नगरसेवक अजित गव्हाणे आणि सहकाऱ्यांचा पक्षप्रवेश भोसरीतील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहामध्ये झाला. त्यावेळी गव्हाणे यांनी "विलास काकांना पंढरपूर देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षपदी संधी द्यावी.." असे साकडे व्यासपीठ बसलेल्या अजितदादांना जाहीरपणे घातले.

दरम्यान, राष्ट्रवादीच्या फुटीनंतर अजित पवार यांच्यासोबत एकनिष्ठ राहिलेल्या आमदार आण्णा बनसोडे यांना पक्षाने विधानसभा उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. बनसोडे पिंपरी विधानसभा मतदार संघातून प्रतिनिधीत्व करतात. या मतदार संघातील प्रभागातून सलग सातवेळा महापालिकेत निवडून आलेल्या माजी महापौर योगेश बहल यांना विधान परिषदेवर संधी मिळावी, अशी अपेक्षा होती. मात्र, स्थानिक राजकारणामुळे बहल यांना संधी मिळाली नाही.

माजी आमदार विलास लांडे यांनी राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून शरद पवार आणि अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात काम केले. राष्ट्रवादीत फूट पडली. त्यावेळी त्यांनी अजित पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला. विधानसभा निवडणुकीत लांडे यांनी अजित गव्हाणे यांचा प्रचार करुन महाविकास आघाडीचे व्यासपीठ गाजवले. विधानसभा निवडणुकीच्या राजकारणात त्यांनी 2004 मध्ये राष्ट्रवादी, 2009 मध्ये अपक्ष आणि 2014 मध्ये पुन्हा राष्ट्रवादी, तर 2019 मध्ये अपक्ष निवडणूक लढवली होती. तसेच, 2014 आणि 2019 मध्ये त्यांनी शिरुर लोकसभा निवडणूक लढवण्याची तयारीही केली होती. 2024 च्या लोकसभा निवडणुकीत महायुतीकडून संधी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना राष्ट्रवादीचे तिकीट देण्यात आले. त्यावेळी लांडे यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. राजकीय परिस्थितीनुसार वेळोवेळी भूमिका बदलणारे विलास लांडे यांना महामंडळावर संधी देण्याबाबत राष्ट्रवादीतून अंतर्गत विरोध होतो आहे.

असा असेल महामंडळ वाटपाचा फॉर्म्युला!

महायुतीमध्ये भाजपाकडून ५० टक्के महामंडळाच्या अध्यक्षपदावर दावा केला जात आहे. शिवसेना ३० टक्के, तर राष्ट्रवादी २० ते २५ टक्के वाटा मागत आहे. शिवसेनेला राष्ट्रवादीयांचा दावा अयोग्य वाटत आहे. त्यांच्यापेक्षा आमचे खासदार व आमदार जास्त असल्याने त्या प्रमाणात महामंडळे मिळावीत, अशी शिवसेनेची मागणी आहे. यामुळं सर्व गोष्टींवर महायुतीचे महामंडळ वाटप रखडले होते. यावर एकमताने तोडगा काढण्यात येणार असून, महापालिका निवडणुकीपूर्वी महामंडळ आणि देवस्थानांच्या अध्यक्षपदांची नियुक्ती आगामी १५ दिवसांत करण्यात येणार आहे, अशी माहिती मुंबईतील विश्वासार्ह सूत्रांनी दिली आहे.

म्हणून योगेश बहलांनी संधी मिळाली पाहिजे!

विधानसभा निवडणुकीत तत्कालीन शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. 25 ते 30 नगरसेवक सोबत घेवून शरद पवार गटात प्रवेश केला. पक्षाला मोठे खिंडार पडले असतानाही योगेश बहल यांनी शहराध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली आणि पक्षाचे अस्थित्व टिकवून ठेवले. 2014 मध्ये तत्कालीन आमदार लक्ष्मण जगताप यांच्यासह अनेकांनी भाजपात प्रवेश केला. माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे यांनीही लोकसभा निवडणुकीत पक्षाला रामराम ठोकला. शहरात प्रचंड राजकीय उलथापालथ होत असताना माजी महापौर योगेश बहल यांनी अजित पवार यांची साथ सोडली नाही. त्यामुळे बहल यांना खऱ्या अर्थाने महामंडळ अथवा देवस्थानच्या अध्यक्षपदी संधी मिळायला हवी, अशी मागणी होत आहे. विशेष म्हणजे, महापालिकेतील कामकाजाचा प्रचंड अभ्यास, उच्चशिक्षीत आणि प्रोफेशनल चेहरा असलेले योगेश बहल आगामी महापालिका निवडणुकीत चांगली कामगिरी करतील. तसेच, स्थानिक आणि शहराबाहेरील लोकांची मोट बांधण्याची क्षमता असल्यामुळे बहल यांना अजित पवार संधी देतील, असा दावा काही लोकांकडून केला जात आहे.

माजी विरोधी पक्षनेते नाना काटे समर्थकांच्या आशा पल्लवीत..!

चिंचवड विधानसभा मतदार संघातून भाजपा आणि शिवसेनेची खुली ऑफर असतानाही माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी पक्षासोबत राहण्याचा निर्णय घेतला. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली. मात्र, महाविकास आघाडीत फूट पडल्यामुळे त्यांना पराभव पत्कारावा लागला. 2024 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या जागावाटपामध्ये चिंचवड भाजपाला गेला. त्यावेळी महाविकास आघाडीकडून नाना काटे यांना ऑफर होती. मात्र, अजित पवार यांच्या सूचनेला मान देवून काटे यांनी आमदार शंकर जगताप यांचा सक्रीयपणे प्रचार केला आणि जगताप विजयी झाली. अजित पवार म्हणजे पक्ष आणि त्यांचा आदेश शिरसावंद्य मानून काम करणारा कार्यकर्ता म्हणून नाना काटे यांना विधान परिषदेवर संधी मिळावी, अशी मागणी होती. "आता विधान परिषद नाही, तर किमान महामंडळावर तरी दादांनी संधी देतील" अशी अपेक्षा नाना काटे समर्थकांना आहे.

“आपल्या मातीतून प्रेरणा घेऊन, स्थानिक तरुणांसाठी

संधी निर्माण करणारा एक यशस्वी उद्योजक!

शिक्षण विश्व: श्री. विनायक पंढरीनाथ भोंगाळे यांची प्रेरणादायी वाटचाल

| पुणे | प्रतिनिधी : महाईन्यूज |

सुमारे ४८ ते ५० वर्षांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, जळगांव (जामोद) येथून शिक्षण घेणाऱ्या श्री. विनायक पंढरीनाथ भोंगाळे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपली वाटचाल सुरू केली. १९८९ साली त्यांनी श्री. गणेशराव पाटील यांच्याकडे केवळ ₹७०० पगारावर शेतीमध्ये सालगडी म्हणून काम सुरू केले होते.

आज ते बांधकाम व्यवसायातील यशस्वी उद्योजक म्हणून ओळखले जातात. त्यांनी पारंपरिक शिक्षणाच्या चौकटीबाहेर जाऊन, एम.बी.ए. न करता प्रत्यक्ष कामाच्या अनुभवातून यशाचा मार्ग दाखवला आहे. पुस्तकांबरोबरच व्यवहारज्ञान, चिकाटी आणि जमिनीशी असलेली नाळ यामुळे त्यांनी यशाचे शिखर गाठले.

“कमवा व शिका” उपक्रमातून नव्या पिढीसाठी दिशा

आपल्या मातीत आणि गावाशी असलेल्या नात्याची जाणीव ठेवून त्यांनी “कमवा व शिका” या नाविन्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात केली आहे. या उपक्रमाचा उद्देश केवळ रोजगारपुरता मर्यादित नसून, स्थानिक तरुणांना व्यवसायिक अनुभव देत उद्योजकतेचा पाया घालणे हा त्यामागचा उद्देश आहे.

विशेष कॅम्पस इंटरव्ह्यू - 28 जून 2025

या उपक्रमाअंतर्गत विशेष कॅम्पस इंटरव्ह्यू आयोजित करण्यात येत आहे, ज्यामध्ये तरुणांना प्रत्यक्ष काम करत शिकण्याची संधी मिळणार आहे. हा उपक्रम एक प्रकारे अनुभवांची शाळा ठरणार आहे.

दिनांक: 28 जून 2025

स्थळ: श्रीमती तुलसीबाई रंगलालजी जाम्बड़ विद्यानिकेतन आणि सीनियर कॉलेज, नांदुरा
नोंदणीसाठी ई-मेल: INFO@YOGESHENTERPRISES.IN
संकेतस्थळ: WWW.YOGESHENTERPRISES.IN

पात्रता:

१०वी / १२वी उत्तीर्ण किंवा शाळा सोडलेले
पदवी अभ्यासक्रमात असलेले किंवा नुकतेच पदवीधर झालेले विद्यार्थी
फ्रेशर्स व उत्साही युवक
योगेश एंटरप्रायझेस तर्फे उपलब्ध संधी व सुविधा:
निवास व राहण्याची सोय
“कमवा आणि शिका” कार्यक्रमांतर्गत प्रत्यक्ष कामाचा अनुभव
निश्चित व कार्यक्षमतेवर आधारित पगार
आकर्षक पगार संरचना

“ही केवळ नोकरी नाही, तर यशस्वी भविष्याची सुरुवात आहे!” स्थानिक युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा व त्वरित नोंदणी करावी. जो यशस्वीपणे मार्ग चालून गेला आहे, त्याच्याकडून यश शिकण्याची ही सुवर्णसंधी आहे. नोंदणीसाठी QR कोड स्कॅन करा अधिक माहितीसाठी संपर्क: INFO@YOGESHENTERPRISES.IN, WWW.YOGESHENTERPRISES.IN साधवा असे आवाहन केले आहे.

---

११ वा आंतरराष्ट्रीय योग महोत्सव कॉलिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया, भोसरी येथे उत्साहात

शिक्षण विश्व : अनेक योग प्रशिक्षक, अभ्यासक व नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

| पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज |

११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कॉलिटी सर्कल एक्सलन्स सेंटर, भोसरी येथील सभागृहात २१ जून रोजी सकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत भव्य योग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात भोसरी परिसरातील अनेक योग प्रशिक्षक, अभ्यासक व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. नारायण हुले यांच्या मार्गदर्शनाखाली योगसाधनेने झाली. सहभागी नागरिकांनी विविध योगासने, श्वसनक्रिया व ध्यानाचा सराव करत योगाच्या आरोग्यदायी फायद्यांची अनुभूती घेतली. कार्यक्रमात सुरेश साळुंखे, वर्षा पारीख, पांडुरंग चव्हाण, संगीता जाधव, शोभा जगताप, उत्तम काकडे व बाळकृष्ण राऊत यांनी विविध योगासने सादर करून उपस्थितांना प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन केले.

प्रेरणादायी व आरोग्यवर्धक कार्यक्रम

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी भोसरी प्रभाग क्र. ८ चे माजी नगरसेवक विलास मडेकरी यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच कॉलिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाचे कौन्सिल मेंबर श्री. संजीव शिंदे यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली. पतंजली योग समिती – पिंपरी चिंचवड विभाग, विलासभाऊ मडेगिरी प्रतिष्ठान आणि कॉलिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या योग महोत्सवात २५० हून अधिक योगाभ्यासकांनी सहभाग घेतला. त्यामुळे कार्यक्रम यशस्वी, प्रेरणादायी आणि आरोग्यवर्धक ठरला.

शिक्षण विश्व: व्ही.के. माटे हायस्कूलमध्ये पालक-शिक्षक संघाची स्थापना

पालक-शिक्षक संघात इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत प्रत्येक वर्गातील पालक आणि शिक्षकांचा समावेश

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड: 2025-26 या शैक्षणिक वर्षासाठी व्ही.के. माटे हायस्कूल, चिंचवड येथे पालक-शिक्षक संघाची (PTA) स्थापना उत्साहात करण्यात आली. प्रारंभी शाळेचा एसएससी बोर्डाचा निकाल 100% लागल्याबद्दल सर्व शिक्षक, विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे अभिनंदन करण्यात आले.

पालक-शिक्षक संघात इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत प्रत्येक वर्गातील पालक आणि शिक्षकांचा समावेश आहे. संघाच्या अध्यक्षपदी पदसिद्ध अध्यक्ष म्हणून मोरया शिक्षण संस्थेच्या कार्यवाह व प्राचार्या मान. सौ. इंद्रायणी माटे-पिसोळकर यांची नियुक्ती करण्यात आली. उपाध्यक्षपदी श्री. विशाल कांबळे यांची पालकांमधून सर्वानुमते निवड करण्यात आली. तर सचिव म्हणून उपशिक्षिका सौ. अनिता बोरसे यांची, व उपसचिव म्हणून पालकांमधून सौ. प्राजक्ता भंडारे यांची निवड झाली.

सभेमध्ये प्राचार्या सौ. इंद्रायणी माटे-पिसोळकर यांनी पालक-शिक्षक संघाचे कार्य, उद्दिष्टे आणि जबाबदाऱ्या यावर सविस्तर मार्गदर्शन केले. पर्यवेक्षिका सौ. मैत्रेयी राजे यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेत "संवर्धन वर्ष" म्हणून साजऱ्या होणाऱ्या वर्षातील उपक्रमांची माहिती दिली.

या प्रसंगी उपमुख्याध्यापक श्री. दिलीप कुमावत आणि शिक्षक समन्वयक श्री. संजय खेडकर यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे स्वागत आणि सूत्रसंचालन सौ. अनिता बोरसे मॅडम यांनी केले. शाळा, शिक्षक, पालक आणि संस्था यांच्यातील समन्वय अधिक मजबूत व्हावा, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्न व्हावेत, या उद्देशाने पालक-शिक्षक संघ कार्यरत राहणार आहे.


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Not just education, but
Personality
transformation.
ADMISSIONS OPEN for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like 'Read-to-Lead'
• Tradition of 100% result
Gayatri English Medium School & Junior College, Charholi
95277 64646 / 77967 67292